माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य, माहिती आयोग खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ८१२/२०२१**

**अपिलार्थी, श्री. मकरंद मधुसूदन सपकाळ,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक,**
**डागा स्मृती शासकीय स्त्री रुग्णालय,** गांधीबाग,
अग्रेसेन चौकाजवळ, गांजाखेत रोड, हंसापूरी, नागपूर

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा डागा स्मृती शासकीय स्त्री रुग्णालय,**
गांधीबाग, अग्रेसेन चौकाजवळ, गांजाखेत रोड, हंसापूरी, नागपूर

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १०.०१.२०२३**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १८.१२.२०२० | २२.१२.२०२० | १४.०१.२०२१ | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १८.१२.२०२०** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " प्रदिप गोपाळराव सपकाळ हे व्यक्ती कोणत्या वर्षी शासकीय नोकरीत कार्यरत झाले व कुठे कार्यरत झाले. याचा तपशील देणे. नोकरीच्या सुरूवातीपासून ते सेवानिवृत्तपर्यंतचा पागाराचा तपशील देणे सेवानिवृत्ती नंतर मिळणारी एकंदर पगाराच्या रक्कमेचा तपशील देणे, पेंशन किती मिळते याचा तपशील देणे." याबाबत माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार वरील विषयांकीत माहिती श्री. प्रदिप गोपाळराव सपकाळ यांचा नोकरीचा तपशिल, व त्या अंतर्गत येणाऱ्या सर्व बाबींची माहिती सबंधीत व्यक्तीच्या अनुमती शिवाय देता येत नाही. असे अपिलार्थीस कळविले.

त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक १४.०१.२०२१** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "विहीत मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहीत मुदतीत कोणत्याही प्रकारची सुनावणी घेवून आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक १२.०३.२०२१** रोजी " विहीत मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे." असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक १०.०२.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी श्री. पी. आर. काळे उपस्थित आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जावर आज झालेल्या सुनावणी दरम्यान सादर कागदपत्राचे अवलोकन व उपस्थितांचे युक्तिवाद विचारात घेता, प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थी यांनी सादर केलेल्या माहिती अर्जानुषंगाने श्री. प्रदिप गोपाळ सपकाळ यांच्या नोकरीचा, पगाराचा तपशिल दि. १८.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये माहिती मागितली. तत्कालिन जनमाहिती अधिकारी यांनी कलम ११ (१) अन्वये, मागितलेली माहिती वैयक्तिक माहिती असून खाजगी स्वरुपाची माहिती असल्याने श्री. प्रदिप सपकाळ यांना दि. १.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, माहिती उघड करावी किंवा कसे याबाबत विचारणा करण्यात आली. त्यानुसार श्री. प्रदिप सपकाळ यांनी जनमाहिती अधिकारी यांना दि. २१.०१.२०२१ रोजी ज्या अर्जदाराने माहिती अधिकारातंर्गत माहिती मागितली माहिती अधिकार नियमानुसार कोणत्याही व्यक्तीचे वैयक्तिक शासकीय सेवा माहिती देता येत नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम कलम ८ (१) (त्र), व कलम ११ अन्वये कोणत्याही आजी/माजी शासकीय कर्मचाऱ्यांची/व्यक्तीची वैयक्तिक माहिती देता येत नाही. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १७.१०.२०१४ रोजीच्या परिपत्रकाचा दाखला देत वैयक्तिक माहिती देण्याबाबत सूचना देण्यात आले आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती कलम ८ (१) (त्र) नुसार देय नाही त्यास अनुसरुन श्री. सपकाळ यांनी प्रथम अपिल अर्ज दाखल करत आग्रही प्रतिपादन केले आहे. तसेच आयोगासमोर व्दितीय अपिल अर्ज दाखल केले. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण २०१२/९८९/प्र.क्र.४७९/सहा, मंत्रालय मुंबई-४०००३२, दिनांक १७ ऑक्टोबर २०१४ नुसार व त्याचबरोबर शासकीय कर्मचारी/अधिका-यास त्याच्या सेवा कालावधीत मिळालेली ज्ञापने, कारणे दाखवा नोटीस, शिक्षादेश, त्याच्या सेवा नियमांतर्गत कामगिरीबाबतचा अहवाल, त्याच्या चल/अचल संपत्तीबाबतची माहिती, त्याने केलेली आर्थिक गुंतवणुक वा बँक किंवा अन्य वित्तीय संस्थाकडून घेतलेली कर्जे, त्याच्या मुलांच्या विवाहात मिळालेल्या भेटी, आयकर विवरणपत्र यासारखी वैयक्तिक तपशिलासंबंधातील माहिती देण्याचे बंधन माहिती अधिका-यांवर नसल्याचा निर्णय **मा. सर्वोच्च न्यायालयाने स्पेशल लीव्ह पिटीशन क्र.२७७३४/२०१२, गिरीश रामचंद्र देशपांडे विरुध्द केंद्रीय माहिती आयोग या प्रकरणात दि. ०३.१०.२०१२ रोजी निर्णय दिलेला आहे. या संदर्भात निर्णय देताना मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्णयपत्राच्या परिच्छेद क्र. १२ व १३ मध्ये पुढीलप्रमाणे निरीक्षण नोंदले आहे.**

१२. "The Petitioner herein sought for copies of all memos, show cause notices and censure/punishment awarded to the third respondent from his employer and also details viz. movable and immovable properties and also the details of his investments, lending and borrowing from Banks and other financial institutions. Further, he has also sought for the details of gifts stated to have accepted by the third respondent, his family members and friends and relatives at the marriage of his son. The information mostly sought for finds a place in the income tax returns of the third respondent. The question that has come up for consideration is whether the above-mentioned information sought for qualifies to be "personal information" as defined in clause (j) of Section ८(१) of the RTI Act.

१३. We are in agreement with the CIC and the courts below that the details called for by the petitioner i.e. copies of all memos issued to the third respondent, show cause notices and orders of censure/punishment etc. are qualified to be personal information as defined in clause (j) of Section ८(१) of the RTI Act. The performance of an employee/officer in an organization is primarily a matter between the employee and the employer and normally those aspects are governed by the service rules which fall under the expression "personal information", the disclosure of which has no relationship to any public activity or public interest. On the other hand, the disclosure of which would cause unwarranted invasion of privacy of that individual. Of course, in a given case, if the Central Public Information Officer or the State Public Information Officer of the Appellate Authority is satisfied that the larger public interest justifies the disclosure of such information, appropriate orders could be passed but the petitioner cannot claim those details as a matter of right."

मा.गिरीश रामचंद्र –वि--केंद्रिय माहिती आयोगाने या प्रकरणात माहितीचा अधिकार व त्यातील त्रयस्थ पक्षाची माहिती प्रदान करण्याबाबत तसेच महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग दि. १७.१०.२०१४ रोजी परिपत्रकात दिलेल्या सूचनाप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिलेला प्रतिसाद माहिती अधिकार अधिनियमाशी सुसंगत असून वरील अर्ज फेटाळण्यात येत आहे,या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.**

**आदेश**

**अपील अर्ज फेटाळण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक :१०.०१.२०२३**

जावक क्रमांक ---2541--- दिनांक 24 APR 2023 ---